# महान कलाकार

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित

एक महान कलाकार आपल्या कॅनव्हाससमोर उभी होती, ऐश्वर्यशाली द्वारकानगरी आपणहून तिच्यासमोर उलगडत होती. तिचा कुंचला कॅनव्हासवर अलगदपणे चहूकडे फिरत फराटे मारत होता, तिच्या हाताच्या प्रत्येक हालचालीत स्वभावतःच एक नृत्य होते, तिच्या कुंचल्याचा प्रत्येक फराटा म्हणजे एक काव्य होते. तिच्या नजरेतून शहरातील घरे आणि मंदिरे एकाएकी वास्तवाहून अधिक ऐश्वर्यशाली आणि अधिक अस्सल वाटत होती, त्यांच्या भिंतींमधील कथा अधिकच उठून दिसत होत्या. शहरातील लोक अधिकच सुंदर दिसत होते आणि त्याबरोबरच कसे कुणास ठाऊक, पण अधिक ठळकपणे खरेदेखील; त्यांच्या वस्त्रांची प्रत्येक घडी, त्यांच्या चेहऱ्यावरील प्रत्येक रेषा विजयाची, दुःखाची, प्रेमाची, आणि हानीची आणि जगलेल्या जीवनाची कथा सांगत होती.

त्या चित्रकाराचे नाव होते चित्रलेखा, आणि ती संपूर्ण द्वारकेमध्ये प्रसिद्ध होती. ती चितारू शकणार नाही अशी जणू कोणतीही गोष्ट नव्हती.

स्वतःमध्ये असलेल्या या गुणांची चित्रलेखाला पूर्ण जाणीव होती. तिला हे माहीत होते की, तिचे नैपुण्य अतुलनीय आहे, तिच्यातील सर्जनशीलता अद्वितीय आहे. तिला माहित होते की, ती महान आहे — आणि त्याहून अधिक महान होण्याची आकांक्षा तिने बाळगली होती.

त्या शहराचे चित्र काढून संपवताना तिने चित्रात सूर्यप्रकाशाने ओथंबलेल्या आकाशावर निळ्या व सोनेरी रंगछटांचा हात फिरवला, ती विचार करू लागली की, आता यापुढे कशाचे चित्र काढावे. रेषा आणि रंगाद्वारे ती असे काय देऊ शकते की, जे विस्मयचकित करू शकेल, दबदबा निर्माण करेल, जे तिला आव्हान देईल आणि तिच्या कौशल्याची अधिकतम क्षमता सिद्ध करेल? द्वारकेच्या प्रत्येक कानाकोपऱ्याचे चित्र तिने काढलेले होते. आतापर्यंत सर्व श्रेष्ठ जनांची व राजेमहाराजांची चित्रे काढून तिने काढलेली होती.

किंवा — काही बाकी राहिले होते का?

याविषयी जेव्हा तिने अधिक विचार केला, तेव्हा चित्रलेखेला जाणीव झाली : एक व्यक्ती होती की, ज्याचे चित्र तिने अद्याप काढले नव्हते. अशी एक व्यक्ती होती जिची तेजस्वीता आणि वैभव तिने कॅनव्हासवर अद्याप चित्रबद्ध केले नव्हते. आणि ते होते प्रत्यक्षात द्वारकेचे आणि त्याशिवाय संपूर्ण जगताचे अधिपती. साक्षात भगवंत : श्रीकृष्ण.

"होय, तेच." चित्रलेखेने विचार केला. "मी जर भगवान श्रीकृष्णांचे चित्र काढू शकले, तर मग प्रश्नच नाही. मी या नगरातील सर्वात कुशल अशी चित्रकार होईन."

या विचाराबरोबरच, चित्रलेखेने आपला कॅनव्हास गुंडाळला आणि ती सरळ महालावर गेली, भगवंतांसमवेत औपचारिक भेट घ्यायला मिळावी ही विनंती करण्यासाठी. अखेरीस महालाच्या रक्षकांनी तिला आत येऊ दिले आणि तिला एका रूंद, हवेशीर मार्गावरून एका दालनात नेले. भगवान श्रीकृष्ण त्या दालनात एका खिडकीजवळ उभे होते. त्या दालनात आणि श्रीकृष्णांच्या सभोवती सूर्यप्रकाश पसरला होता, त्यामुळे त्यांच्या मुकुटातील मोरपीसे अधिकच चमकदार दिसत होती. भगवान श्रीकृष्णांच्या सभोवती एक तेजोवलय निर्माण झाले होते.

चित्रलेखाच्या आगमनाची सूचना मिळताच भगवंतांनी मागे वळून पाहिले.

"चित्रलेखा," ते स्मितहास्य करत म्हणाले, "महान कलाकार. मी तुझे स्वागत करू इच्छितो. मी काय करू शकतो तुझ्यासाठी?"

"हे प्रभु," चित्रलेखा म्हणाली. "मी हे विचारण्यास आले आहे की, तुमचे चित्र काढण्याचे सौभाग्य तुम्ही मला प्रदान कराल का?"

कदाचित ती प्रकाशाची करामत होती, पण श्रीकृष्णांच्या भावमुद्रेमध्ये असे काहीतरी होते ज्याचा थांग चित्रलेखेला लागला नाही — त्यांच्या डोळ्यांमधील तेज?

क्षणभरानंतर ते नाहीसे झाले. आणि श्रीकृष्ण एवढेच म्हणाले, "निश्चितच. उद्यापासून तू सुरुवात करू शकतेस."

आपल्या या महद्भाग्याने रोमांचित होऊन जात चित्रलेखा पुढील तयारी करण्यासाठी घराकडे पळाली. दुसऱ्या दिवशी सकाळी आवश्यक सर्व सामानासह म्हणजेच तिचे कॅनव्हास, कॅनव्हास ठेवायचा स्टँड, तिचे उत्तम कुंचले आणि रंग घेऊन ती परत आली. तिने दालनामध्ये प्रवेश करताच तिला असे दिसून

आले की, श्रीकृष्ण एका सुशोभित केलेल्या सिंहासनावर विराजमान झाले आहेत आणि त्यांनी आपला हात सिंहासनाच्या कडेवर ठेवला आहे.

“हे कसे वाटते आहे?” श्रीकृष्णांनी चित्रलेखेला विचारले “तुला चित्र काढण्यासाठी हे आसन योग्य आहे का?”

“होय प्रभु, धन्यवाद. हे तर अगदी योग्य आहे.” चित्रलेखेने आपले स्टँड उभे करून त्याला टेकू दिला आणि ती काम करण्यास सज्ज झाली.

तिचे नेत्र एकदा श्रीकृष्णांकडे आणि एकदा कॅनव्हासकडे फिरत होते. तिच्या डोळ्यांनी ग्रहण केलेल्या प्रत्येक नवीन आकृतीनुसार, प्रत्येक नवीन छायेनुसार, प्रत्येक नवीन वळणानुसार तिच्या हातातील कुंचला एखाद्या कळसूत्री बाहुलीसारखा फिरत होता. अशाप्रकारे कित्येक तास ती चित्र काढत राहिली.

अखेरीस, ती आपल्या कॅनव्हासपासून मागे फिरली. “हे प्रभु,” आपले कपाळ पुसत ती म्हणाली. “माझे काम जवळजवळ पूर्ण होतच आले आहे. तुमची हरकत नसल्यास चित्र पूर्ण करण्यासाठी मी उद्या परत येऊ इच्छिते.”

“हो, काहीच हरकत नाही,” श्रीकृष्ण म्हणाले. “ तू उद्या परत ये.”

म्हणून दुसऱ्या दिवशी चित्रलेखा परत आली आणि तिने पुन्हा चित्र काढण्यास सुरुवात केली. योग्य रंग निवडण्यात आणि भगवंतांच्या मोरपिसाचा तुरा अगदी हुबेहूब रंगवण्यात ती इतकी निमग्न झाली होती की, तिथे काहीतरी निराळे आहे हे तिला कळण्यास बराच वेळ लागला.

ते सिंहासन — *ते सिंहासन!* ज्यावर भगवान श्रीकृष्ण काल विराजमान झाले होते! ते गायब झाले होते. आता त्याऐवजी, ते उभे होते. ते थेट चित्रलेखेकडे पाहत होते, त्यांच्या मुखावर हास्य विलसत होते.

“हे प्रभु!” चित्रलेखा उत्तरली. “मला वाटते की, तुम्ही तुमचे आसन बदलले आहे.”

“होय,” श्रीकृष्ण हळूच म्हणाले. “उभे असलेल्या स्थितीत तू माझे चित्र काढलेस तर बरे होईल.”

*ठीक,* चित्रलेखेने विचार केला, हे तर अनपेक्षित आहे.

“परंतु — हे प्रभु,” ती म्हणाली, “याचा अर्थ असा होतो की, मला पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करावी लागेल.”

“ओह,” श्रीकृष्ण म्हणाले, त्यांचे नेत्र किंचितसे विस्फारले होते. “अरे, होय, तू तसे करशील असे मला वाटते.”

“मी — मी — होय. ठीक आहे तर मग. मी तसेच करेन.” चित्रलेखा चेहऱ्यावरील गोंधळ लपवण्याचा अयशस्वी प्रयत्न करत दुसरा कॅनव्हास चाचपडू लागली.

तिने एक दीर्घ श्वास घेत पुन्हा एकदा चित्र काढायला सुरुवात केली. काही वेळानंतर ती परत त्या स्थितीत आली, जी तिला परिचित वाटत होती. रंग एकत्र येऊ लागले होते, आकारांना अर्थ येऊ लागला होता, ती भगवंताच्या भावमुद्रेतील सर्व बारिकसारिक तपशीलांचे चित्र काढत होती, की —

*थांब जरा.* चित्रलेखा मागे सरकली. *काही बदलले होते का — ?*

हळुवारपणे आणि काहीशा धास्तीने कॅनव्हासच्या कडेने ती बाहेर डोकावली. अपेक्षेनुसार, श्रीकृष्णांची भावमुद्रा बदलली होती. आता ते स्मितहास्य करत नव्हते; त्यांची भावमुद्रा आता खंबीर, करारी अशी होती.

“हे — हे प्रभु,” चित्रलेखा पुटपुटली.

“काय झाले, चित्रलेखा?”

“तुमची भावमुद्रा. . . .”

“अरे, होय,” श्रीकृष्ण म्हणाले. ती मी बदलली आहे. तू अशा प्रकारेच माझे चित्र काढ.

*त्यांचे या प्रकारेच चित्र काढ,* या वाक्याची चित्रलेखाने स्वतःशीच पुनरावृत्ती केली. चित्रलेखेने साहस गोळा करून पुन्हा चित्रात बदल करण्याचा प्रयत्न केला. *काही हरकत नाही. हे मी करू शकते.* तिने श्रीकृष्णाकडे पाहून मान डोलावली आणि आपला कुंचला उचलला.

क्षणभरानंतर तिने तो पुन्हा खाली ठेवला.

“हे प्रभु!” ती म्हणाली.

“काय झाले चित्रलेखा?”

“*ते* काय करत आहेत?” तिने धष्टपुष्ट सेवकांच्या जोडगोळीकडे बोट दाखवले, जे एक मोठे सोनेरी सिंहासन त्यांच्या हातांनी ओढत श्रीकृष्णाकडे घेऊन जात होते.

“माझे सेवक, असे म्हणायचे आहे का तुला?” श्रीकृष्ण म्हणाले. “ते माझ्यासाठी सिंहासन इकडे आणत आहेत.”

“हे प्रभु, तुम्ही त्या सिंहासनावर बसणार आहात काय?”

“होय, अर्थातच. आणि त्यावर विराजमान झालेल्या स्थितीत तू माझे चित्र काढणार आहेस.”

चित्रलेखेचे डोळे एखाद्या बशीइतके मोठे झाले. ती निःशब्द झाली. ती आपल्या रंगांच्या प्लेटकडे वळली, तिने पुन्हा एकदा रंग एकत्र मिसळले, आणि — करणार तरी काय? — तिने पुन्हा एकदा सुरुवात केली.

हे असेच अशा प्रकारे अनेक दिवस, अनेक आठवडे, अनेक महिने घडत राहिले. चित्रलेखेला चित्र काढण्यातून उसंत मिळत असे, ती केवळ हे लक्षात येण्यासाठी की, आणखी काही फेरफार करण्याची गरज आहे — भगवंताची भावमुद्रा बदललेली आहे किंवा त्यांचे आसन बदलले आहे, किंवा त्यांना पाठीमागचा देखावा बदलण्याची गरज आहे अथवा आणखी नवीन टेकू आणण्याची गरज आहे. चित्रलेखेने अंगी असलेल्या प्रत्येक कौशल्याचा, आतापावेतो तिने शिकलेल्या रंगकामाच्या आणि चित्रकलेच्या प्रत्येक शैलीचा उपयोग केला. परंतु, कशाचाच उपयोग झाला नाही. भगवंत हालचाल करत आणि तिचा कुंचला त्यांच्या हालचालीचा अंदाजच बांधू शकत नसे.

अखेर एक दिवस जेव्हा तिचे सर्व मार्ग खुंटले, तेव्हा ती सल्ला घेण्यासाठी महर्षी नारदांकडे गेली. नारद हे भगवंताचे महान भक्त होते.

संपूर्ण अपयशी कथा त्यांना सांगून झाल्यावर, विलाप करत तिने याचना केली, “हे महर्षी, मी काय करू?”

नारदांनी मृदूल नजरेने तिच्याकडे पाहिले. “चित्रलेखा बाळा,” ते हळुवारपणे म्हणाले. “भगवंताचे चित्र काढण्याची तुझी खरोखरच इच्छा असेल, तर तुझा कॅनव्हास स्वच्छ असायला हवा.”

* * *

*एक स्वच्छ कॅनव्हास?* महर्षींचे शब्द चित्रलेखेच्या कानात घुमले. चित्र काढणे सुरू ठेवण्यासाठी हळूहळू महालाकडे जाण्यास निघालेली असताना ते शब्द तिच्या मनात घोळत होते. *एक स्वच्छ कॅनव्हास.*

तिचा स्टँड तिथेच होता, त्याच जागी जिथे तो नेहमी असायचा आणि तिचे रंग आणि कुंचले सर्व व्यवस्थितपणे मांडून ठेवलेले होते. यावेळी भगवंत उभ्या स्थितीत होते.

तिने आपल्या कॅनव्हासला टेकू लावला.

"तू सुरुवात करण्यास तयार आहे का?" श्रीकृष्णांनी तिला विचारले.

चित्रलेखा क्षणभर थांबली. "मला तसे वाटते आहे, प्रभु," ती म्हणाली. "होय, मला वाटते आहे की, ती एक प्रकारची सुरुवातच आहे."

"तुला काय म्हणायचे आहे चित्रलेखा?" भगवंतांना मात्र याची पूर्णपणे जाणीव असल्याचे त्यांच्या नेत्रांमधून दिसत होते.

"हे प्रभु, मला वाटते आहे की, सरतेशेवटी मला ते उमजले आहे. माझ्याकडे आपले चित्र आहे."

"आता आहे का ते तुझ्याकडे?" श्रीकृष्ण म्हणाले. "बघू तरी दे मला."

चित्रलेखेने श्रीकृष्णांकडे कॅनव्हास वळवला. फक्त एवढेच की — पाहायला गेले तर तो कॅनव्हास नव्हता किंवा निदान तो त्या प्रकारचा तरी कॅनव्हास नव्हता ज्याचा वापर करणे तिच्या अंगवळणी पडले होते. त्याऐवजी ते होते एक स्वच्छ, एखादी गोष्ट हुबेहूब कशासारखी आहे हे दाखवणारे काचेचे एक तावदान : एक आरसा.

भगवंतांनी आरशात आपले प्रतिबिंब पाहिले आणि मग ते चित्रलेखेकडे वळले.

तो क्षण असा होता, जेव्हा चित्रलेखेचे डोळे भगवंतांच्या डोळ्यांशी भिडले, जेव्हा तिथे काहीही नव्हते पण एका अदृश्य सोनेरी धाग्याने त्यांची दृष्टी तिच्या दृष्टीशी जोडली गेली होती, जेव्हा तिला जाणवले की तिच्या अस्तित्वाचे भान त्या करुणेच्या अथांग गहनतेत विरघळून जाते आहे — *त्याच* क्षणी एकाएकी रंगांचा विस्फोट झाला.

आणि त्यांचा विस्फोट झाला कंपनासह, सौंदर्यासह, छटांसह आणि तिच्या कल्पनांच्या पलीकडील आनंदाने. यापूर्वी ती रंग पाहू शकत होती, पण आता — *आता* — ती असे रंग पाहात होती जे अद्याप अदृश्य होते. यापूर्वी तिला पोत जाणवत होता, परंतु आता मऊपणा आणि रेशीम तिच्या स्वतःच्या अस्तित्वापासून अतूट होते. ती मौनाचे संगीत ऐकत होती, ते नादरूपात स्थिर होण्याआधी; आणि ती ऐकत होती तिच्या आत्म्याचे काव्य व त्याची लय जी अगदी तिच्या हृदयाच्या ठोक्याइतकीच निकटची होती, तिच्यामधून तत्परतेने उंचबळत होता एक भावावेग, जो नियंत्रित करता येत नव्हता.

आणि मनातल्या मनात ती नृत्य करत होती, चित्रलेखा, रंग तिच्या हृदयातून बाहेर प्रसरित होत होते आणि प्रकाशाचा धबधबा तिच्या अस्तित्वावर कोसळत होता. हे चित्र ती निर्माण करत होती का, की ती स्वतःच ते चित्र होती? कदाचितच ती जाणत होती. ज्याची क्वचितच तिने पर्वा केली होती.

चित्रलेखेने तिचे हात स्वतःच्या चेहऱ्याकडे नेले. तिथे ओलसरपणा पाहून तिला आश्चर्य वाटले. स्वतःच्या अश्रुपूर्ण डोळ्यांची उघडझाप करताना भगवंताचे मुखकमल पुन्हा तिच्या केंद्रस्थानी आले, सूर्याप्रमाणे तेजस्वी आणि कल्याणकारी मुखकमल. त्यांनी आपले मस्तक डोलावले.

आणि चित्रलेखेने, महान कलाकाराने कुंचला उचलला.

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.